## अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  १५/०८/२०२३  चे ००.०१ ते १६.०० वा.

**दुखापत**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बडनेरा अप नं. ५९६/२०२३ कलम ३२४, ५०४, भादवी | राहते घरी उसरेवाडी जुनी वस्ती बडनेरा | घटना ता.वेळ - दि. १४/८/२०२३ चे २२.३० वा दि. १४/८/२०२३ चे ०७.०० वा दि. १५/८/२०२३ ०७.५४वा | रोहीत कैलाश उसरे वय- ३५ वर्ष रा. उसरेवाडी जुनी वस्ती बडनेरा | प्रविण कैलाश उसरे वय- ३८ वर्ष रा. उसरेवाडी जुनी वस्ती बडनेरा | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि.व आरोपी हे सख्खे भाऊ असुन नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी फि.चा त्याची आई सोबत किरकोळ वाद झाला असता नमुद आरोपी हा तेथे आला व फि.स शिवीगाळ करून तु आमच्या घरातुन निघुन जा.असे म्हणुन आरोपीने त्याच्या हातातील लाठीने फि.च्या डाव्या कानावर मारले तसेच डोक्यावर कपाळावर सुध्दा मारले. त्यामुळे फि.च्या डावे कानाला व कपाळाला जख्म होवुन रक्त निघाले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क् ४०५/२३ कलम ३२४,५०४, ५०६ भादवी | अमरावती | घता वेऴ दि. १५/०८/२०२३ चे १०/०० वा दाखल ता वेळ दि. १५/०८/२०२३ चे १२/३९ वा | एक महीला | एक महीला | हकीकत अशा प्रकरे   आहे `की, फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असुन दोघे ही एकाच घरात वेगवेगळ्या राहतात. व कपडे धुण्याची एकच जागा आहे नमुद घटना ता वेऴी व ठिकाणी फिर्यादी र्हि  कपडे ` धुवत होती तेव्हा आरोपी ने फिर्यादीला म्हटले  मला अगोदर कपडे धु दे  त्यावर फिर्यादीना `तिला म्हटले  मी रोज पहीले कपडे धुते त्याकारणावरुन आरोपी ने  फिर्यादी सोबत भांडण केले व ऐ जगह तेरे बाप की नही है   असे म्हणुन तेथे ठेवलेला चटणी वाटण्याची दगडी वरवंटा उचलुन फिर्यादीचे डोक्यावर मारुण जख्मी केले तेव्हा तिचे पती फिर्यादीला वाचविण्याकरिता आले असता त्यांना सुद्धा आरोपीने शिवीगाऴ करुन मारण्ययाची धमकी दिली अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## विनयभंग

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोस्टे फ्रजरपुरा अप क्र.६४३/२३ कलम ३५४ भा.द.वी. | अमरावती | १५.०८.२०२३ चे १२.००वा.<br><br>दाखल ता वेळ १५.०८.२०२३ चे ००.५३वा. | एक महीला | प्रमोद गावंडे रा.अकोला. | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी चे नातेवाईक हे अच्छुत महाराज दवाखाना मार्डी रोड येथे उपचाराकरीता भर्ती असुन नमुद घटना ता वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी ही व इतर रुग्नाचे नातेवाईक दवाखान्याच्या हॉलमध्ये खाली झोपले होते नमुद आरोपी हा सुध्दा तिथे झोपला होता आरोपीने फिर्यादीच्या कुरत्यामधुन हात टाकुन फिर्यादीची छाती दाबली फिर्यादीस स्पर्श झाल्याने जाग आली असता फिर्यादी लगेच उठली व नमुद आरोपीने मला माफ करा असे म्हटले फिर्यादी जोरजोराने बोलली असता तेथे झोपलेले लोक जागे झाले. नमुद आरोपी ने फिर्यादीची छाती दाबुन विनयभंग केला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | पोस्टे फ्रेजरपुरा अप क्र.६४२/२०२३ कलम ३५४(अ),५०४,५०६ भा.द.वि. | अमरावती | १४/८/२०२३चे २१.००वा<br><br>दाखल ता वेळ १५/०८/२३ चे ०१.४१वा. | एक महीला | आकाश शिरसाठ रा. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी ही घरासमोर उभी असताना नमुद आरोपी हा घरासमोर आला व फिर्यादीस म्हणाला की मला तुझ्यासोबत लग्न करायचे आहेमाझ्या सोबत लग्न कर माझे तुझ्यावर प्रेम आहे असे म्हणुन फिर्यादीच्या खाद्याला त्याचे खांद्याने धक्का दिला. म्हणुन फिर्यादी ही ओरडली असता मोहल्यातील लोक जमल्याने आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली.आरोपी हा नेहमी फिर्यादीची छेडखानी करतो.फिर्यादीच्या अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## वाहन चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अपक्र.१०२३/२३ कलम-३७९ भादवी | पंचवटी चौक पुलाखाली नाईट डे बार च्या समोर अमरावती | घतावेऴ दि. १३.८.२३ चे सकाळी ५.३० वा ते रात्री ८.३० वा चे दरम्यान दातावेऴ दि. १५.८.२३ चे १४.३६ वा | सागर शंकरराव गायकवाड वय-२९ रा. भुरडे याच्या घरी भाड्याने प्रशांत नगर अमरावती | अज्ञात | हकीकत- हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी यातील नमुद फिर्यादी हे त्याच्या ताब्यातीलअसलेली गाडी क्र.एम एच -३१-ईएल -४२१३ ही ड्रीम निओ मोटार सायकल कि.अ. ७०,०००/- रु . ही नमुद ठिकानी उभी करुन ते चिखलदरा येथे फिर्यादी हे गेले व परत आले असता त्याना नमुद ठिकानी गाडी दिसुन आली नाही . त्यामुऴे डिओ याच्या आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## अपघात

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे बडनेरा अप.क्र.५९५/२३ कलम २७९, ३३७, ३३८ भा.दं.वि.सह कलम १३६ मो.वा. | श्रीनाथ रेसिडेन्सी ते हिन्दु स्मशान भुमीच्या टर्निंग जवळ नवी वस्ती बडनेरा | घटना ता.वेळ- दि.२३.०७.२०२३ चे १३.०० वा. माहिती ता.वेळ - दि.१४.०८.२०२३ चे २३.१५ वा. दाखल ता.वेळ - दि.१५.०८.२०२३ चे ००.१४ वा. | गणेश मधुकर वैद्य वय- ३९ वर्ष रा. ग्राम दाभा ता.नांदगाव खंडे. जि.अमरावती | समीर कुलकर्णी रा. पवन नगर नवी वस्ती बडनेरा चा चालक MH०४ FJ १५२० | हकिकत अशा प्रकारे आहे की,यातील फि.हे त्यांच्या दु.चाकी क्र.MH २७ AG ८४५२ ने नेहमी दाभा ते पवन नगर बडनेरा येथे जाणे येणे करतात. नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील फि.हे त्यांचे दुचाकीने जात असतांना यातील समीर कुलकर्णी रा. पवन नगर नवी वस्ती बडनेरा चा चालक MH०४ FJ १५२० हा भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन समोरुन येवुन फि.च्या वाहनास धडक दिली. त्यामुळे फिच्या डाव्या पायाला गंभीर जख्म होवुन रक्त निघत होते. ट्रक च्या समोरील दोन्ही चाकाच्या मध्ये ट्रक च्या खाली गाडी सह पडुन होता ट्रक अपघाताच्या कारणाने जागीच उभा होता. फि.च्या उपचार सुरु होते त्यामुळे आज रोजी उशीराने रिपोर्ट देत आहे. अशा जबानी रिपोर्ट वरुन व मेडी.सर्टी.वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अपक्र.१०२१/२३ कलम- २७९,३३७, ३३८ भादवी | पंचवटी चौक अमरावती | घतावेळ दि.२.८.२०२३ चे ९.००वा<br>दातावेळ दि.१५.८.२३ चे १२.५९ वा | आदीत्य शरदराव तारे वय- ३७ रा. राधे राधे दुध डेअरी जवळ साईनगर अमरावती | ऑटो क्र एम एच २७ -बीडब्लु ३८६२ याचा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी यातील फिर्यादी हे आसेगाव पुर्णा येथे त्याच्या नोकरी करीता जात असताना ते त्याच्या मित्राचीवाट पाहत नमुद ठिकानी उभे असताना नमुद आटो चालक हा आला व भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने आटो चालकाने फिर्यादीस धडक दिली त्यामुळे फिर्यादिस डाव्या हाताला मारलागला व फॅक्चर झाले त्यामुळे डिओ याच्या आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | पो.स्टे. नांदगांवपेठ मर्ग क्र. ३७/२०२३ कलम १७४ जा.फौ. | वाळकी डॅम | रेशीव राजेंद्र वांगे वय १६ वर्ष रा. प्रिया टाउन शिप ता. जि. अमरावती | श्रीजीत किशोर काळबांडे वय १६ वर्ष रा. कठोरा बु. अमरावती | पाण्यात बुडून मृत्यू | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व त्याचे मित्र हे दिप नवले व रेशीव राजेंद्र वांगे हे तिघे वाळकी डॅम येथे पोहण्याकरिता दिनांक १४/०८/२०२३ रोजी १४.३० वा दरम्यान गे होते. यातील रेशीव राजेंद्र वांगे हा पोहण्याकरिता खोल पाण्यात उतरला असता त्याला पोहता येत नसल्याने तो पाण्यात बुडाला. फिर्यादी यांनी १०० नंबर वर कॉल करून माहिती दिली. सदर ठिकाणी पोलीस स्टॉप व आय.आर.बी. ॲम्ब्युलन्स तेथे पोहचले व महानगरपालीका अग्नीशामक दल कर्मचारी यांचे मततीने त्यास बाहेर काढले व इर्विन दवाखाना येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषीत केले. अशा फिर्यादी यांचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा मर्ग दाखल | तपासी अधिकारी सपोनि. राजपुत मॅडम पो.स्टे. नांदगावपेठ |

## प्रोव्हीशन रेड

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | फ्रेजरपुरा | ६४१/२३कलम ६५ ई म.दा.का. | प्रबुध्द मंडळ रोडवरील सार्वजनीक ठिकाणी फ्रेजरपुरा अमरावती | १४/०८/२०२३ चे२२.२० वा. | १५/०८/२३ चे ००.३८ वा. | नापोका गजानन महादेवराव ढेवले ब.न.१६९गुन्हे शाखा अमरावती शहर | कालु गंगु रायलीवाले वय३२ रा.प्रबुध्द मंडळ फ्रेजरपुरा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद फिर्यादी हे गुन्हे शाखा अमरावती येथे कार्यरत असुन मा.पोनि गुन्हेशाखा यांचे आदेशाने पोलीस आयुक्तालय हद्दीत खाजगी वाहणाने स्टाफ सह पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन नमुद आरोपी हा त्यांचे खाद्यावर पायदळ जाताना दिसला त्यास पंचासमक्ष थाबंवुन त्यांच्या जवळ असलेल्या पिशवीची तपासनि केली असता १)४८नग देशी दारु टँगो पंच चे सिलबंद बॉटले प्रत्येकी ७० रु नग एकुन३३६०/रु २)देशी दारु बॉबी संत्रा ४४ नग प्रत्येकी७०रु प्रमाने एकुन३०८०/रु असा एकुन६४४०/-रु चा मुद्देमाल मिळुन आल्याने फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | फ्रेजरपुरा | ६४४/२३कलम ६५ ई मदाका. | अमरावती | १५/०८/२०२३ चे१०.३०वा.. | १५/०८/२०२३चे १३.३१वा. | सरतर्फे पोहेका योगेश श्रीवास ब.न.१०१५ पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती | एक महीला | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पोस्टाफ सह पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खात्रीलायक बातमीवरुन नमुद घटास्थळी पंचाना सोबत घेवुन प्रोव्ही रेड केली असता नमुद आरोपी ही अवैद्यरीत्या दारु विक्री करीत असताना मिळुन आली पंचासमक्ष तिच्या जवळ असलेल्या पिशवीची तपासनी केली असता त्यात ९ नग देशी दारु बॉबी संत्रा पावट्या कि.अ.७२० रु चा प्रोव्ही माल मिळुन आल्याने फिर्यादीच्या अशा लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३. | बडनेरा | अप.क्र.५९७/२३ कलम ६५(ई) मदाका | बडनेरा | दि.१५.०८.२०२३ चे ०४.३० वा. | दि.१५.०८.२०२३ चे ०८.२५ वा. | सरतर्फे पोहेका घनश्याम यादव ब.नं.१७५८ पोस्टे बडनेरा | एक महीला | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना १० नग देशी दारूबॉबी संत्रा च्या प्रत्येकी १८० ml पावट्या, कि.अं. ७००/- रू चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल |

